D:\pp\KANDALVAN\KANDALVAN Noting & Letter. (Autosaved).docx

२८

महाराष्ट्र शासन
महसूल व वनविभाग

**जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग**


हिराकोट तळयाजवळ, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड४०२२०१
❖दुरध्वनी क्र:०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२३२२❖फॅक्स क्र:०२१४१-२२७४५१❖
❖ई-मेल:tahasildarmahasul@gmail.com❖


क्र.मशा/जमीन/अ-०३/कांदळवन/३२४/२०२० दिनांक:१३/०१/२०२०.

प्रति,
मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक,
कांदळवन कक्ष,३०२ बेक फिल्ड हाऊस, ,
तिसरा मजला, ब्रिटानिया रेस्टॉरंट जवळ, बॅलार्ड इस्टेट,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

**विषय:- कांदळवन वेबसाईटवर प्राप्त तक्रारीबाबत**
**उरण तालुक्यामध्ये विकास व पायाभूत सुविधांच्या नावाने होणाऱ्या खाजण जमिनी व न भरुन येणाऱ्या पर्यावरणाच्या ऱ्हासा संबंधित आपले लक्ष वेधणेबाबत.**
**(श्री.नंदकुमार पवार)** तक्रार क्र. ९२.

अर्जदार श्री.नंदकुमार पवार यांनी उरण तालुक्यामध्ये विकास पायाभुत सुविधांच्या नावाने होणाऱ्या खाजण जमिनी व न भरुन येणाऱ्या पर्यावरणाच्या ऱ्हासाबाबत दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तहसिलदार उरण यांनी स्थळपाहणी करुन उपविभागीय अधिकारी पनवेल यांचेकडे अहवाल सादर केलेला आहे. उपविभागीय अधिकारी पनवेल यांनी खालीलप्रमाणे अहवाल सादर केला आहे.

श्री.नंदकुमार पवार यांनी विषयांकित प्रकरणी केलेल्या तक्रार अर्जानुसार दि.०३/१२/२०१९ रोजी मंडळ अधिकारी उरण व तलाठी सजा नवघर यांनी संयुक्त स्थळपाहणी करुन, पुढीलप्रमाणे अहवाल सादर केला आहे. जे.एन.पी.टी. ते पनवेल एन.एच.४ बी या महामार्गालगत पंजाब कॉन्वेअरच्या बाजूला असलेल्या कांदळवनाची पाहणी केली असता, कांदळवनाची झाडे सुकलेल्या अवस्थेत आढळून आली. तसेच, आज स्थितीला नव्याने लागवड झाल्याचे दिसून आलेले नाही व आज मितीस नमूद ठिकाणी कांदळवनाचा नाश झाल्याचे आढळून आले नाही. सबब, तक्रारदार यांचा तक्रारी अर्ज निकाली ठेवण्याबाबत कळविले आहे.

तरी, उपरोक्त वस्तुस्थितीचे अवलोकन करता, आज मितीस जे.एन.पी.टी. ते पनवेल एन.एच.४ बी या महामार्गालगत पंजाब कॉन्वेअरच्या बाजूला असलेल्या नमुद ठिकाणी कांदळवनाचा ऱ्हास झालेला नसल्यामुळे अर्जदार यांचा अर्ज निकाली ठेवण्यात यावा असे वाटते.

उपविभागीय अधिकारी पनवेल यांचेकडील दि.०६/१२/२०१९ रोजीचा चौकशी अहवाल, मंडळ अधिकारी उरण यांचेकडील स्थळपाहणी अहवाल, पंचनामा मागील ३ वर्षातील google images व MRSAC नकाशाच्या प्रती माहितीस्तव सोबत जोडल्या आहेत.

(डॉ.विजय सूर्यवंशी)
जिल्हाधिकारी रायगड

जावक
तारीख - 14.1.2020
सही -
संगणिक